**कालमर्यादा / महत्वाचे**

क्र.पोमसं/३-अ/१०/जीटी-१५ श्वानपोनि/५६/१५
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगत सिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-०१
मुंबई.दि.१६/४/२०१५

**परिपत्रक:-**

**संदर्भ** :- १.महाराष्ट्र पोलीस (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम-२०१४, व
२.महाराष्ट्र पोलीस (सुधारणा ) अध्यादेश-२०१५,दि.१६/०२/२०१५

**विषय** :- सार्वत्रिक बदल्या-२०१५:
श्वान पथकातील पोलीस निरीक्षक

---ooo---

श्वान पथकातील पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबत शासनाने उपरोक्त संदर्भ क्र.२ मधील अध्यादेशानुसार खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे:-

१) दि.३१/५/२०१५ पर्यंत किंवा त्यापूर्वी ज्या पोलीस निरीक्षक यांचा प्रचलित नियमांनुसार (महाराष्ट्र पोलीस सुधारणा अध्यादेश -२०१५) एका ठिकाणचा ०३ वर्षांचा सामान्य पदावधी पूर्ण झाला असेल त्या पोलीस निरीक्षकांची माहिती त्यांच्या बदलीच्या विनंतीसह या कार्यालयास पाठवावी. जेणेकरून, पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ च्या मान्यतेने त्यांच्या बदल्या करण्यात येतील.

२) त्याचप्रमाणे, विहित कालावधी पूर्ण झालेला नसतांना सध्याच्या ठिकाणाहून इतर ठिकाणी बदली करण्यासाठी विनंती केलेल्या पोलीस निरीक्षकांची माहिती त्यांच्या विनंतीच्या ठिकाणांसह या कार्यालयास दि.२४/०४/२०१५ पर्यंत पाठवावी. तसेच, सर्व घटक प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील पोलीस निरीक्षकांना लेखी स्वरुपात स्पष्ट सूचना द्याव्यात की,

I. त्यांनी त्यांच्या बदली संदर्भात वारंवार विनंती अर्ज न करता एकाच अर्जात त्यांची जी काही विनंतीची ठिकाणे असतील ती नमूद करुन सदरचा अर्ज संबंधित घटक प्रमुखांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह दि.२४/०४/२०१५ पर्यंत या कार्यालयास पाठवावा.

II. पोलीस निरीक्षकांनी या कार्यालयास सादर केलेल्या/ करण्यात येणाऱ्या विनंती अर्जांच्या आगाऊ प्रतींची संख्या ही असंख्य असल्याने अशा प्रकारे या कार्यालयास मोठ्या प्रमाणावर प्राप्त होणाऱ्या प्रत्येक आगाऊ प्रतींवर या कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही करणे शक्य होणार नाही. त्याचप्रमाणे, काही पोलीस अधिकारी अशा आगाऊ प्रतींचा संदर्भ, त्यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे सादर केलेल्या मूळ अर्ज प्रकरणात नमूद करुन सदर आगाऊ प्रतींवर/संदर्भावर या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत मा.न्यायाधिकरणामार्फत विचारणा करतात. त्यामुळे योग्य मार्फतीने प्राप्त झालेल्या संदर्भाव्यतिरिक्त आगाऊ प्रतींवर कार्यवाही करणे, अथवा त्याबाबतचे स्पष्टीकरण या कार्यालयाकडून देणे संयुक्तीक होणार नाही.

III. तसेच, जर पोलीस निरीक्षकांना या कार्यालयात मा.पोलीस महासंचालक, अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) व विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना) यांना प्रत्यक्ष विनंती अर्ज सादर करणे अगदीच आवश्यक असल्यास अशा पोलीस अधिकाऱ्यांनी प्रथम त्यांच्या अर्जावर संबंधीत घटकप्रमुखांचे अभिप्राय / मत घेणे आवश्यक असेल, आणि ते पोलीस दलाच्या शिस्तीस अनुसरुन योग्य होईल.

३. सार्वत्रिक बदल्या या एप्रिल-मे या महिन्यांमध्ये करणे नियमान्वये आवश्यक आहे. त्याकरिता सर्व संबंधीत घटकांकडून प्राप्त झालेल्या माहितीची छाननी, तपासणी करुन त्यांचे संगणकांवर योग्य प्रकारे संकलन करुन त्यानंतर पुनः तपासुन /छाननी अंती ती पोलीस आस्थापना मंडळासमोर सादर केली जाते. या सर्व कामकाजासाठी अंदाजे एक महिन्यांचा कालावधी आवश्यक आहे. त्यामुळे घटकप्रमुखांनी वरील सूचनांनुसार त्यांच्या घटकांची माहिती विहीत वेळेत म्हणजे दिनांक २४/०४/२०१५ पुर्वी न चुकता पाठवावी. यामध्ये कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यांची माहिती पाठवावयाचे नजर चुकीने राहून गेले, त्यास संबंधीत घटक प्रमुख हे जबाबदार राहतील.

४. तरी घटकप्रमुखांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त १ ते ३ मुद्यांमध्ये नमूद केल्याप्रमाणे पोलीस निरीक्षक यांच्या याद्या व संपूर्ण सेवातपशील इत्यादि माहिती पोलीस निरीक्षक यांचे **स्वतंत्र पत्रे तयार करुन दिनांक २४/०४/२०१५ पुर्वी निश्चितपणे पोहोचतील अशाप्रकारे ह्या (कार्यासन क्र.३-अ स्वतंत्रपणे) कार्यालयास पाठवावी.**

५. घटक प्रमुखांनी सदरची माहिती हया परिपत्रकासोबत जोडलेल्या सेवापतशिलाच्या नमुन्याप्रमाणेच योग्य रकान्यात योग्य माहिती नमूद करुन संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांच्या अद्ययावत व बिनचूक सेवातपशिलांची विवरणपत्रे ही A ४ size पेपरवर प्रत्येकी एक, याप्रमाणे पाठवावीत.

६. सर्व घटकप्रमुखांनी प्रस्तुत बाबींकडे कृपया वैयक्तिक लक्ष पुरवावे.

७. सर्व घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, पोलीस निरीक्षकांच्या सार्वत्रिक बदल्या-२०१५ बाबतची माहिती ह्या कार्यालयातील नोंदणी शाखेत न देता ती थेट कार्यासन क्र.३-अ मध्ये स्वतंत्र लिफाफामध्ये देण्याबाबत. तसेच सदरची माहिती संबंधीत कार्यासनात प्राप्त झाल्याबाबतची खात्रीदेखील करण्याबाबतच्या सूचना संबंधीत लिपीक व टपाल डयुटीवरील कर्मचाऱ्यांना द्याव्यात.

(सही) १६/४/१५

**( वि. डी. मिश्रा )**
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
म.रा.मुंबई

प्रति,

पोलीस आयुक्त, मुंबई शहर,
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा.,पुणे

नमुना- विवरणपत्र

श्वान पोलीस निरीक्षकांच्या सार्वत्रिक बदल्या-२०१५

| अ.क्र. | श्वान पोलीस निरीक्षकांचे नांव | सेवातपशील (घटकात हजर झाल्यापासून सध्याच्या नेमणुकीपर्यंतच्या घटकांतर्गत नेमणुकांचा तपशील) | पसंतीची ठिकाणे (मूळ जिल्हा नेमणूक अनुज्ञेय नसल्याने मूळ जिल्ह्याचा उल्लेख करु नये.) | घटक प्रमुखांचे अभिप्राय (अभिप्राय देतांना विनंती मध्ये नमूद बाबी खऱ्या आहेत किंवा कसे, याबाबत अभिप्राय नमूद करावेत. फक्त शिफारस करु नये.) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | नाव-<br><br>नेमणुकीचे ठिकाण-<br><br>मूळ जिल्हा-<br><br>सेवानिवृत्ती दिनांक- | श्वान पोलीस उपनिरीक्षक<br><br>श्वान पोलीस निरीक्षक | विनंतीचे ठिकाण-<br><br>मला पाहिजे असलेल्या बदली / नेमणुकीबाबत या अर्जाव्यतिरिक्त अन्य कोणाही व्यक्तीकडे संदर्भ / विनंती केली नाही. अशी विनंती अन्य कोणाही माफत प्राप्त झाल्यास तिचा माझ्याशी संबंध नाही व त्याचा विचार करण्यात येवू नये. तसेच, विनंती केलेल्या जागी बदली मिळणे हा माझा अधिकार नसून प्रशासकीय सोयीनुसार व उपलब्ध रिक्त पदांची स्थिती विचारात घेवून माझ्या बदलीचा विचार केला जाई ही बाब मला मान्य आहे.<br>(अर्जदाराची स्वाक्षरी) | (घटक प्रमुखांची स्वाक्षरी) |

**कालमर्यादा / महत्वाचे**
क्र.पोमसं/३-अ/१०/जीटी-१५/५७/१५
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगत सिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-०१
मुंबई,दि.१६/४/२०१५

**संदर्भ :-** १.महाराष्ट्र पोलीस (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम-२०१४, व
२.महाराष्ट्र पोलीस (सुधारणा ) अध्यादेश-२०१५,दि.१६/२/२०१५

**विषय :-** सर्वसाधारण बदल्या-२०१५
बिनतारी संदेश विभाग, मोटार परिवहन विभागातील पोलीस निरीक्षक

---ooo---

**परिपत्रक:-**

पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षक व मोटार परिवहन विभागातील पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबत शासनाने उपरोक्त संदर्भ क्र.२ मधील अध्यादेशानुसार खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे:-

१) दि.३१/५/२०१५ पर्यंत किंवा त्यापूर्वी ज्या पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षक यांचा प्रचलित नियमांनुसार (महाराष्ट्र पोलीस सुधारणा अध्यादेश -२०१५) एका ठिकाणचा ०३ वर्षांचा सामान्य पदावधी पूर्ण झाला असेल त्या पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षकांची माहिती त्यांच्या बदलीच्या विनंतीसह या कार्यालयास पाठवावी. जेणेकरून, पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ च्या मान्यतेने त्यांच्या बदल्या करण्यात येतील.

२) पोलीस निरीक्षकांचा एका ठिकाणचा कालावधी दि.३१/०५/२०१५ पर्यंत किंवा त्यापुर्वी ३ वर्षे पूर्ण होत असणाऱ्या अधिकाऱ्यांची माहिती त्यांच्या बदलीच्या विनंती अर्जासह या कार्यालयास पाठवावी. तथापि, पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षक यांची विनंती व उपलब्ध रिक्त पदे विचारात घेऊन प्रशासकीय सोयीनुसार त्यांच्या बदल्या हया पोलीस आस्थापना मंडळाच्या मान्यतेने करण्यात येतील.

३) तरी खालील पोलीस अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की,

(I) पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षक (अभियांत्रिकी / वाहतूक)

(II) मोटार परिवहन विभागातील पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षक

सध्याच्या पदावर दि.३१/५/२०१५ पर्यंत तीन वर्ष कालावधी पूर्ण झालेला आहे. अशा सर्व संबंधीत पोलीस घटक कार्यालयांकडून माहिती प्राप्त करुन घेवून, त्यांची छाननी, तपासणी करुन सोबतच्या विवरणपत्रात भरुन वार्षिक सर्वसाधारण बदल्यांचे प्रस्ताव त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्राय/शिफारशींसह पोलीस आस्थापना मंडळ-२ यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्याकरिता दि.२४/०४/२०१५ पर्यंत निश्चितपणे पाठवावीत. यामध्ये कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यांची माहिती पाठवावयाचे नजर चुकीने राहून गेले, त्यास संबंधीत घटक प्रमुख हे जबाबदार राहतील.

२. वरील माहिती ही **गोपनीय स्वरुपातील असल्याने का.क्र.३-अ व का.क्र.५अ यांना लक्षवेध करुन स्वंतत्र लखोटयामधून सदरची माहिती Hard copy, आणि Soft copy मध्ये मराठी (DVB-TTSurekh) या फॉंट (Font) मध्ये घेवून दि.२४/०४/२०१५ पर्यंतच या कार्यालयास पाठवावी.**

३. खालील अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षकांच्या सार्वत्रिक बदल्या-२०१५ बाबतची माहिती ह्या कार्यालयास सादर करताना सदरची माहिती ह्या कार्यालयातील नोंदणी शाखेत न देता ती थेट कार्यासन क्र.३-अ व ५-अ मध्येच देण्याबाबत. तसेच सदरची माहिती संबंधीत कार्यासनात प्राप्त झाल्याबाबतची खात्रीदेखील करण्याबाबतच्या सूचना संबंधित लिपीक व टपाल डयुटीवरील कर्मचाऱ्यांना द्याव्यात.

१६/४/१५

**( व्हि. डी. मिश्रा )**
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
म.रा.मुंबई

प्रति,

अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश विभाग, म.रा.,पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म.रा.,पुणे.

नमुना- विवरणपत्र

पोलीस बिनतारी संदेश विभागातील पोलीस निरीक्षक (अभियांत्रिकी) (वाहतूक) सार्वत्रिक बदल्या-२०१५

| अ.क्र. | पोलीस निरीक्षकांचे नांव | सेवातपशील (घटकात हजर झाल्यापासून सध्याच्या नेमणुकीपर्यंतच्या घटकांतर्गत नेमणुकांचा तपशील) | पसंतीची ठिकाणे (मूळ जिल्हा नेमणूक अनुज्ञेय नसल्याने मूळ जिल्ह्याचा उल्लेख करु नये.) | घटक प्रमुखांचे अभिप्राय (अभिप्राय देतांना विनंती मध्ये नमूद बाबी खऱ्या आहेत किंवा कसे, याबाबत अभिप्राय नमूद करावेत, फक्त शिफारस करु नये.) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | नाव-<br>नेमणुकीचे ठिकाण-<br>मूळ जिल्हा-<br>सेवानिवृत्ती दिनांक- | पोलीस उपनिरीक्षक<br>पोलीस निरीक्षक | विनंतीचे ठिकाण-<br>मला पाहिजे असलेल्या बदली / नेमणुकीबाबत या अर्जाव्यतिरिक्त अन्य कोणाही व्यक्तीकडे संदर्भ / विनंती केली नाही. अशी विनंती अन्य कोणाही माफत प्राप्त झाल्यास तिचा माझ्याशी संबंध नाही व त्याचा विचार करण्यात येवू नये. तसेच, विनंती केलेल्या जागी बदली मिळणे हा माझा अधिकार नसून प्रशासकीय सोयीनुसार व उपलब्ध रिक्त पदांची स्थिती विचारात घेवून माझ्या बदलीचा विचार केला जाई ही बाब मला मान्य आहे.<br>(अर्जदाराची स्वाक्षरी) | (घटक प्रमुखांची स्वाक्षरी) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (व्हि.डी.मिश्रा)<br>अपर पोलीस महासंचालक (आस्था.)<br>सदस्य-सचिव | (  )<br>प्रधान सचिव,गृहविभाग<br>(अपिल व सुरक्षा) सदस्य | (संजीव दयाल)<br>पोलीस महासंचालक<br>अध्यक्ष | (प्रवीण दीक्षित)<br>महासंचालक, (ला.लु.प्र.वि.)<br>सदस्य | (राकेश मारिया)<br>पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई<br>सदस्य | (के.एल.बिश्नोई)<br>अपर पोलीस महासंचालक<br>(का .व सु.) सदस्य |

**कालमर्यादा / महत्वाचे**
क्र.पोमसं/३-अ/१०/जोटो-१४ रापोनि/५५/१५
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगत सिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-०१
मुंबई,दि.१६/४/२०१५

**परिपत्रक:-**

**संदर्भ :-** १.महाराष्ट्र पोलीस (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम-२०१४, व
२.महाराष्ट्र पोलीस (सुधारणा ) अध्यादेश-२०१५,दि.१६/२/२०१५

**विषय :-** सार्वत्रिक बदल्या २०१५:
राखीव पोलीस निरीक्षक

---ooo---

राखीव पोलीस उपनिरीक्षक व राखीव पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबत शासनाने उपरोक्त संदर्भ क्र.२ मधील अध्यादेशानुसार खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे:-

१) दि.३१/५/२०१५ पर्यंत किंवा त्यापूर्वी ज्या राखीव पोलीस उपनिरीक्षक व राखीव पोलीस निरीक्षक यांचा प्रचलित नियमांनुसार (महाराष्ट्र पोलीस सुधारणा अध्यादेश -२०१५) एका ठिकाणचा ०३ वर्षांचा सामान्य पदावधी पूर्ण झाला असेल त्या राखीव पोलीस उपनिरीक्षक व राखीव पोलीस निरीक्षकांची माहिती त्यांच्या बदलीच्या विनंतीसह या कार्यालयास पाठवावी. जेणेकरुन, पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ च्या मान्यतेने त्यांच्या बदल्या करण्यात येतील.

२) त्याचप्रमाणे, विहित कालावधी पूर्ण झालेला नसतांना सध्याच्या ठिकाणाहून इतर ठिकाणी बदली करण्यासाठी विनंती केलेल्या राखीव पोलीस उपनिरीक्षक व राखीव पोलीस निरीक्षकांची माहिती त्यांच्या विनंतीच्या ठिकाणांसह या कार्यालयास दि.२४/०४/२०१५ पर्यंत पाठवावी. तसेच, सर्व घटक प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील राखीव पोलीस उपनिरीक्षक व राखीव पोलीस निरीक्षकांना लेखी स्वरुपात स्पष्ट सुचना द्याव्यात की,

I. त्यांनी त्यांच्या बदली संदर्भात वारंवार विनंती अर्ज न करता एकाच अर्जात त्यांची जी काही विनंतीची ठिकाणे असतील ती नमूद करुन सदरचा अर्ज संबंधित घटक प्रमुखांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह दि.२४/०४/२०१५ पर्यंत या कार्यालयास पाठवावा.

II. राखीव पोलीस उपनिरीक्षक व राखीव पोलीस निरीक्षकांनी या कार्यालयास सादर केलेल्या/ करण्यात येणाऱ्या विनंती अर्जांच्या आगाऊ प्रतींची संख्या ही असंख्य असल्याने अशा प्रकारे या कार्यालयास मोठ्या प्रमाणावर प्राप्त होणाऱ्या प्रत्येक आगाऊ प्रतींवर या कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही करणे शक्य होणार नाही. त्याचप्रमाणे, काही पोलीस अधिकारी अशा आगाऊ प्रतींचा संदर्भ, त्यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे सादर केलेल्या मूळ अर्ज प्रकरणात नमूद करुन सदर आगाऊ प्रतींवर/संदर्भावर या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत मा.न्यायाधिकरणामार्फत विचारणा करतात. त्यामुळे योग्य मार्फतीने प्राप्त झालेल्या

संदर्भाव्यतिरिक्त आगाऊ प्रतींवर कार्यवाही करणे, अथवा त्याबाबतचे स्पष्टीकरण या कार्यालयाकडून देणे संयुक्तीक होणार नाही.

III. तसेच, जर राखीव पोलीस उपनिरीक्षक व राखीव पोलीस निरीक्षकांना या कार्यालयात मा.पोलीस महासंचालक, अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) व विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना) यांना प्रत्यक्ष विनंती अर्ज सादर करणे अगदीच आवश्यक असल्यास अशा पोलीस अधिकाऱ्यांनी प्रथम त्यांच्या अर्जावर संबंधीत घटकप्रमुखांचे अभिप्राय / मत घेणे आवश्यक असेल, आणि ते पोलीस दलाच्या शिस्तीस अनुसरुन योग्य होईल.

३) सार्वत्रिक बदल्या या एप्रिल-मे या महिन्यांमध्ये करणे नियमान्वये आवश्यक आहे. त्याकरिता सर्व संबंधीत घटकांकडून प्राप्त झालेल्या माहितीची छाननी, तपासणी करुन त्यांचे संगणकांवर योग्य प्रकारे संकलन करुन त्यानंतर पुन: तपासून /छाननी अंती ती पोलीस आस्थापना मंडळासमोर सादर केली जाते. या सर्व कामकाजासाठी अंदाजे एक महिन्यांचा कालावधी आवश्यक आहे. त्यामुळे सर्व घटकप्रमुखांनी वरील सूचनांनुसार त्यांच्या घटकांची माहिती विहीत वेळेत म्हणजे दिनांक २४/०४/२०१५ पुर्वी न चुकता पाठवावी. यामध्ये कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यांची माहिती पाठवावयाचे नजर चुकीने राहून गेले. त्यास संबंधीत घटक प्रमुख हे जबाबदार राहतील.

४) तरी सर्व घटकप्रमुखांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त १ ते ३ मुद्यांमध्ये नमूद केल्याप्रमाणे राखीव पोलीस उपनिरीक्षक व राखीव पोलीस निरीक्षक यांच्या याद्या व संपूर्ण सेवातपशील इत्यादि माहिती (राखीव पोलीस उपनिरीक्षक व राखीव पोलीस निरीक्षक या दोन संवर्गासाठी) **स्वतंत्र दोन पत्रे तयार करुन दिनांक २४/०४/२०१५ पुर्वी निश्चितपणे पोहोचतील अशाप्रकारे ह्या (कार्यासन क्र.३-अ व ५-अ ह्या कार्यासनास स्वतंत्रपणे ) कार्यालयास पाठवावी.**

५) घटक प्रमुखांनी सदरची माहिती ह्या परिपत्रकासोबत जोडलेल्या सेवापतशिलाच्या नमुन्याप्रमाणेच योग्य रकान्यात योग्य माहिती नमूद करुन संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांच्या अद्ययावत व बिनचूक सेवातपशिलांची विवरणपत्रे ही A ४ size पेपरवर प्रत्येकी एक, याप्रमाणे पाठवावीत.

६) सर्व घटकप्रमुखांनी प्रस्तुत बाबींकडे कृपया वैयक्तिक लक्ष पुरवावे.

७) सर्व घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, राखीव पोलीस उपनिरीक्षक व राखीव पोलीस निरीक्षकांच्या सार्वत्रिक बदल्या-२०१५ बाबतची माहिती ह्या कार्यालयातील नोंदणी शाखेत न देता ती थेट कार्यासन क्र.३-अ व ५-अ मध्येच स्वतंत्र लिफाफ्यामध्ये देण्याबाबत. तसेच सदरची माहिती संबंधीत कार्यासनात प्राप्त झाल्याबाबतची खात्रीदेखील करण्याबाबतच्या सूचना संबंधीत लिपीक व टपाल ड्युटीवरील कर्मचाऱ्यांना द्याव्यात.

( वि. डी. मिश्रा ) १८/४/१५

अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),

म.रा.मुंबई

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई

अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.रा.,मुंबई,
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई
सर्व पोलीस आयुक्त,
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र / कोल्हापूर परिक्षेत्र / नाशिक परिक्षेत्र/ नागपूर परिक्षेत्र/अमरावती परिक्षेत्र/नांदेड परिक्षेत्र/ औरंगाबाद परिक्षेत्र,
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, सिव्हिल लाईन्स, नागपूर
अपर पोलीस आयुक्त, सशस्त्र पोलीस नायगांव, बृहन्मुंबई
सर्व पोलीस अधीक्षक
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

नमुना- विवरणपत्र
राखीव पोलीस निरीक्षकांच्या सार्वत्रिक बदल्या-२०१५

| अ.क्र. | राखीव पोलीस निरीक्षकांचे नांव | सेवातपशील (घटकात हजर झाल्यापासून सध्याच्या नेमणुकीपर्यंतच्या घटकांतर्गत नेमणुकांचा तपशील) | पसंतीची ठिकाणे (मुळ जिल्हा नेमणूक अनुज्ञेय नसल्याने मूळ जिल्ह्याचा उल्लेख करु नये.) | घटक प्रमुखांचे अभिप्राय (अभिप्राय देतांना विनंती मध्ये नमूद बाबी खऱ्या आहेत किंवा कसे, याबाबत अभिप्राय नमूद करावेत, फक्त शिफारस करु नये.) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | नाव-<br><br>नेमणुकीचे ठिकाण-<br><br>मूळ जिल्हा-<br><br>सेवानिवृत्ती दिनांक- | राखीव पोलीस उपनिरीक्षक<br><br>राखीव पोलीस निरीक्षक | विनंतीचे ठिकाण-<br><br>मला पाहिजे असलेल्या बदली / नेमणुकीबाबत या अर्जाव्यतिरिक्त अन्य कोणाही व्यक्तीकडे संदर्भ / विनंती केली नाही. अशी विनंती अन्य कोणाही माफत प्राप्त झाल्यास तिचा माझ्याशी संबंध नाही व त्याचा विचार करण्यात येवू नये. तसेच, विनंती केलेल्या जागी बदली मिळणे हा माझा अधिकार नसून प्रशासकीय सोयीनुसार व उपलब्ध रिक्त पदांची स्थिती विचारात घेवून माझ्या बदलीचा विचार केला जाई ही बाब मला मान्य आहे.<br>(अर्जदाराची स्वाक्षरी) | (घटक प्रमुखांची स्वाक्षरी) |